**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-१ सोमवार दिनांक २६/११/२००७

ठराव क्रमांक -१ सोमवार दिनांक २६/११/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक२६/१०/२००७रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा दि.२६/१०/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- मागील दि.२६/१०/२००७ रोजीचे सभे मध्ये मा.अधिकारी मा.पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडयाने लावणे करिता आलेले कमीचे दर मंजूर केलेले आहेत. सदरचे ठराव क्र. आठ प्रमाणे मंजूर केलेल्या इंडिका वाहनाचे दरा मध्ये आपणांस वॅगनर,सॅन्ट्रो ही वाहने भाडयाने मिळाल्यास ती मनपाने भाडयाने लावावीत या प्रमाणे मागील ठरावा मध्ये दुरूस्ती करावी.

मा.श्री सभापती साहेब - प्रशासनाने तसा प्रस्ताव तयार करावा.

मा.श्री बारस्कर पो.ज.- मा.सभापती साहेब आपण नागापूर ,बोल्हेगांव या संपूर्ण उपनगरासाठी स्मशान भूमीकरिता जागा उपलब्ध करून मिळणे साठी यादी दिलेली होती.त्यांचे काय झाले.

नगर रचनाकार श्री धोंगडे एस.डी.-लिगल रिटेनर यांचेकडून सदर प्रकरणी त्यांचे मत मागविलेले आहे.

मा.सभापती साहेब - मा.उपायुक्त साहेब यांनी सदर प्रकरणी कायदेशीर सल्ला घेणे साठी लिगल रिटेनर यांचे कडेस पत्र पाठविले असल्याचे मला पत्राने कळविलेले आहे. लिगल रिटेनर यांचे आज आलेले मता प्रमाणे नागापूर,बोल्हेगांवासाठी स्मशान भूमि करिता सदर जागा खरेदीसाठीचा प्रस्ताव नविन स्मशान भूमि व सुधारणे साठीचे तरतुदीतून तातडीने करणेत यावा.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- तसेच मागील सभेत ठराव क्रमांक अकराचे मंजूरी नुसार श्री सोनवणे यांना व्यवसायाकरीता जागा भाडयाने देण्याचे ठरले होते. त्या ठरावाप्रमाणे अद्याप पर्यत त्यांना जागेचा ताबा दिलेला नाही.

नगर रचनाकार श्रीधोंगडे एस.डी.-प्रकरण पुढील तजविजीकरिंता मार्केट विभागाकडेस पाठविलेले आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- जागेचा ताबा लवकर दिला नाही तर मनपाचे उत्पन्न बुडते मनपा अधि.नियम ७९ नुसार चे नियमा प्रमाणे आपण जागा भाडयाने देवू शकतो. स्थायी समितीने मंजूरी देवूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. अर्जदार यांचे कडून आठ दिवसांचे आंत डिपॉझीट भरून घेवून करारनामा करून घेवून त्यांना जागा भाडयाने देण्याची कार्यवाही पूर्ण करावीइतिवृत्त मंजूरीचे ठरावात तसा उल्लेख करावा.मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करावे.

मा.श्री तिवारी सु.र.व मा.सौ.शेंडगे रो.सं.-त्याप्रमाणे दुरूस्ती करून मागीलसभेचे इतिवृत्त मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :-अर्जदार श्री. योगेश नामदेव सोनवणे यांना स्थायी समिती ठराव नं.११ दि. २६/१०/२००७नुसार व्यवसायाकरिता जागा देणेस मंजूरी देवूनही अद्यापही कार्यवाही झालेली नसल्याने मनपाचे उत्पन्न वाढविणेचे दृष्टीने अर्जदार यांचे कडून डिपॉझिट भरून घेवून करारनामा करून घेवून त्यांना जागा भाडयाने देण्याची कार्यवाही आठ दिवसांचे आतमध्ये पूर्ण करून घ्यावी.मागील सभा दि.२६/१०/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव** - मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/१०/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे

अर्जदार श्री योगेश नामदेव सोनवणे यांना स्थायी समिती ठराव नं. ११ दि.२६/१०/२००७ नुसार व्यवसायाकरिता जागा देणेस मंजूरी देवूनही अद्यापही कार्यवाही झालेली नसल्याने मनपाचे उत्पन्न वाढविणेचे दृष्टीने अर्जदार यांचे कडून डिपॉझिट भरून घेवून करारनामा करून घेवून त्यांना जागा भाडयाने देण्याची कार्यवाही आठ दिवसांचे आतमध्ये पूर्ण करून घ्यावी.

मागील सभा दि.२६/१०/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक - मा.श्री तिवारी सु.र.

अनुमोदक - मा.सौ.शेंडगे रो.सं.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक-२ सोमवार दिनांक २६/११/२००७

ठराव क्रमांक -२ सोमवार दिनांक २६/११/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ८ मधील अध्योध्या नगर,ताराबाग कॉलनी,अमितनगर व एकता कॉलनी अंतर्गत ४५० व ३०० एम.एम. व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व एस्टिमेट रूपये ३२,९८,५४९/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय - प्र.क्र.८ मध्ये अयोध्यानगर ,ताराबाग कॉ.,अमितनगर,अंतर्गत व एकाता कॉलनी अंतर्गत ४५० व ३०० एम.एम. व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणे

विनंती रिपोर्ट कि, अयोध्यानगर,अमितनगर,एकता कॉलनी येथील ड्रेनेज लाईन पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. तसेच ताराबाग हौ. सोसायटी मध्ये देखील ड्रेनेज आउटलेटची व्यवस्था नाही. सदर ठिकाणी वसाहती वाढल्याने अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन अपुरी असून ड्रेनेज वारंवार चोकअप होत आहे. त्यामुळे उपरोक्त भागातील नागरिकांनी अंतर्गत वसाहती मध्ये ड्रेनेज लाईन टाकून देणे बाबत स्थानिक नगसेवकांमार्फत मागणी केलेली आहे. म.न.पा. मार्फत केडगांव इंडस्ट्रियल इस्टेट ते केडगाव देवीरोड वरील नाल्यापर्यत ३०० व ४५० एम.एम. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आलेला आहे.

एकता कॉलनी अमितनगर,ताराबाग व अयोध्यानगर येथील अंतर्गत प्रस्तावीत ड्रेनेजलाईन औद्योगिक वसाहत ते केडगाव देवीकडे जाणा-या मुख्य ड्रेनेज लाईनला जोडात येईल.दि.७/८/०७ रोजी मा.महापौर साहेब ,व मा.उपायुक्त साहेब -(कर) व स्थानिक नगरसेवक यांच्या समक्ष पाहणी केली असून अंतर्गत भागात ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पहाणी करून सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.३२,९८,५४९/-(अक्षरी रक्कम रू.बत्तीस लाख अठ्ठयान्नव्व हजार पाचशे एकोण पन्नस मात्र) खर्च अपक्षीत आहे.

तरी सदरच्या कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरीसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब - ड्रेनेज लाईनचे कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री तिवारी सु.र.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज.- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब - ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे प्र.क्र.८ मधील आयोध्यानगर,ताराबाग कॉलनी,अमितनगर व एकता कॉलनी अंतर्गत ४५० व ३०० एम.एम. व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व एस्टिमेट रूपये ३२,९८,५४९/- (रूपये बत्तीस लाख अठठयान्नव हजार पांचशे एकोण पन्नास फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री तिवारी सु.र.

अनुमोदक - मा.श्री बारस्कर पो.ज

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-३ सोमवार दिनांक २६/११/२००७

ठराव क्रमांक -३ सोमवार दिनांक २६/११/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नवीपेठ दवाखाना येथील प्रयोग शाळे मध्ये सेमी ॲटो ॲनालायझर मशिनवर करावयाच्या नवीन तपासण्या चालू करणेस व त्यांचे दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजूकर-** प्रती, मा.नगरसचिव, मनपा अ.नगर-यांचे कडेस

टिपण्णी- नवीपेठ दवाखाना येथे सेमी ॲटो सेमी ॲटो ॲनालयझर मशीन घेण्यात आलेले आहे. सदरच्या मशीनवर करावयाच्या तपासण्या व त्यांचे दर तसेच काही नवीन चालू करावयाच्या तपासण्या व त्यांचे दर खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रयोग शाळेतील तपासणीचा प्रकार | नवीपेठ दवाखाना येथे सूचविण्यात आलेले तपासणी योग्य दर |
|---|---|---|
| १ | एस.जी.ओ.टी. | ३५/- |
| २ | एल.डी.एच. | ४५/- |
| ३ | ट्राय ग्लिसराईड | १२०/- |
| ४ | सि.अल्ब्युमिन | ३०/- |
| ५ | सि.टोटल प्रोटीन | ३०/- |
| ६ | डेंग्यु टेस्ट (रॅपीड) | ३३०/- |
| ७ | मलेरिया टेस्ट (रॅपीड) | ६५/- |
| ८ | एच.आय.व्ही. (रॅपीड) | ६०/- |
| ९ | ऑस्टेलिया अँटेजीन (एच.बी.व्ही.) | ४०/- |
| १० | युरिन ॲसिटोन बॉडीज | ३०/- |

तरी नवीपेठ दवाखाना येथे वरील तपासण्या चालू करण्यांस मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस ठेवण्यासाठी मा.आयुक्त साहेब यांनी मंजूरी दिलेली आहे.तरी योग्य त्या मंजूरीसह पुढील कार्यवाहीसाठी मंजूरीस शिफारस आहे.

येणे प्रमाणे मेडीकल ऑफिसर नवी पेठ दवाखाना यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री तिवारी सु.र.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.व मा.श्री बारस्कर पो.ज.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नवीपेठ दवाखाना येथील प्रयोग शाळेमध्ये सेमी ॲटो ॲनालायझर मशिनवर करावयाच्या नवीन तपासण्या चालू करणेस व त्यांचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. अखेर मंजूरीस्तव मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सुचक - मा.श्री तिवारी सु.र.
अनुमोदक - मा.श्री बारस्कर पो.ज.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-४ सोमवार दिनांक २६/११/२००७

ठराव क्रमांक-४ सोमवार दिनांक २६/११/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिके मध्ये विविध विकासाची कामे करणे साठी कनिष्ठ अभियंत्याची पदे अपुरी पडत असल्याने म.न.पा.चे बांधकाम, पाणी पुरवठा इत्यादी विभागांसाठी एकूण पंधरा कनिष्ठ अभियंत्याची पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरून सदर विभागासाठी पदनिर्मितीचे प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय - कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंत्याची (ज्युनियर इंजिनिअर) मानधनावर नेमणुक करणेस मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावना:- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विकासाची काम करणेसाठी कनिष्ठ अभियंतेची पदे अपुरी पडत असल्यामुळे तसेच पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी कनिष्ठ अभियंताची आवश्यकता असले बाबतचे मॅकेनिकल इंजिनिअर यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. महापालिकेकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे जलद गतीने विकास कामे करणे मध्ये अडचणी निर्माण होत आहेत. याचा विचार करून प्रशासकीय कामाची निकड पहाता सध्या कार्यरत व मंजूर पदे वगळता खालील अभियंतेची आवश्यकता आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बांधकाम विभागासाठी | ४ | सिव्हील इंजिनियर |
| २ | पाणी पुरवठा विभागासाठी | ७ | सिव्हील इंजिनियर |
| ३ | पाणी पुरवठा वसंत टेकडी | १ | मॅकेनिकल/ इलेक्ट्रीक इंजिनियर |
| ४ | पाणीपुरवठा मुळानगर वसंतटेकडी मॅकेनिकल | १ | मॅकेनिकल इंजिनिअर |
| ५ | घनकचरा व्यवस्थापनासाठी | १ | सिव्हील इंजिनियर (आरोग्य विभागासाठी ) |
| ६ | इलेक्ट्रीकल इंजिनियर | १ | (इलेक्ट्रीक विभागासाठी) |
| | एकूण | १५ | |

वरील कनिष्ठ अभियंतेची पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात भरणे बाबतचे शैक्षणिक पात्रता व इतर माहिती मूळ प्रस्तावामध्ये नमूद करणेत आलेली आहे.

वरील प्रमाणे १५ कनिष्ठ अभियंत्याची तातडीने आवश्यकता असून सध्या पदे मंजूर नसल्याने तुर्तास सदरची पदे मा.स्थायी समितीचे मान्यतेने नंतर तातडीने कंत्राटी पध्दतीने ठरावीक रकमेच्या मानधनावर देवून पद निर्मीतीचा प्रस्ताव मान्यतेस महानगरपालिका सभे कडे पाठविणे योग्य होईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सविनय सादर.

येणे प्रमाणे मा.सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिके मध्ये विविध विकासाची कामे करणे साठी कनिष्ठ अभियंत्याची पदे अपुरी पडत असल्याने म.न.पा.चे बांधकाम, पाणी पुरवठा इत्यादी विभागांसाठी एकूण पंधरा कनिष्ठ अभियंत्याची पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरून सदर विभागासाठी पदनिर्मितीचे प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री शेख मुदस्सर अ.इ.:- म.न.पा.चे मोटार व्हेईकल विभागा साठी ऑटोमोबाईल इंजिनिअरचे एक पद निर्माण करून ते कंत्राटी पध्दतीने भरण्यांत यावे. सदर पदासाठी डिप्लोमा धारक व पांच वर्षाच्या कामाचा अनुभव असलेला उमदेवार असावा.तसेच सर्वच सिव्हील इंजिनिअर या पदाची शैक्षणिक पात्रता डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअर व ५ वर्ष अनुभव अशी ठेवावी मात्र घनकचरा व्यवस्थापन व इलेक्ट्रीकल इंजिनिअर या पदाची पात्रता बी.ई .अशी ठेवावी.

मा.श्री. तिवारी सु.र:- प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:- मंजूर .

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा. तसेच म.न.पा. मध्यें भरावयाच्या इंजिनिअरचे पदा मध्ये डिप्लोमा धारक पांच वर्षाचा कामाचा अनुभव असलेला एक ऑटोमोबाईल इंजिनिअर मानधनावर घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. बांधकाम व पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाची शैक्षणिक पात्रता डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअर व ५ वर्ष अनुभव तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी कनिष्ठ अभियंता बी.ई.सिव्हील व इलेक्ट्रीकल इंजिनिअर या पदाची शैक्षणिक पात्रता बी.ई. इलेक्ट्रॅानिक्स अशी ठेवण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदरचे पदनिर्मितीचा प्रस्ताव अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्यांत यावे.

**<u>ठराव</u>** :- अहमदनगर महानगरपालिके मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी कनिष्ठ अभियंत्याची पदे अपुरी पडत असल्याने म.न.पा.चे बांधकाम,पाणी पुरवठा इत्यादी विभागासाठी एकूण पंधरा अभियंत्याची पदे कंत्राटी पध्दतीने तापुरत्या स्वरूपात मानधनावर भरणेस त्याच प्रमाणे महानगरपालिके मध्ये भरावयाच्या वरील पदा मध्ये मोटार व्हेईकल विभागासाठी डिप्लोमा धारक पांच वर्षाचा कामाचा अनुभव असलेला एक ऑटोमोबाईल इंजिनिअरचे पद निर्मीतीस व ते कंत्राटी पध्दतीने मानधनावर भरणेस मंजूरी देण्यांत येत आहे. बांधकाम व पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाची शैक्षणिक पात्रता डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअर व ५ वर्ष अनुभव तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी कनिष्ठ अभियंता बी.ई.सिव्हील व इलेक्ट्रीकल इंजिनिअर या पदाची शैक्षणिक पात्रता बी.ई. इलेक्ट्रॅानिक्स अशी ठेवण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदरचे पदनिर्मितीचा प्रस्ताव अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभे पुढे पाठविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

सुचक - मा.श्री तिवारी सु.र.
अनुमोदक - मा.श्री बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-५ सोमवार दिनांक २६/११/२००७

ठराव क्रमांक-५ सोमवार दिनांक २६/११/२००७

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे नगर पुणे रोड वरील विद्यमान जकात नाक्यासाठी चास सर्व्हे नं. १०७ मधील दहा गुंठे जागा रूपये सात हजार दरमहा प्रमाणे भाडयाने घेणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय **-** नगर पुणे रोडवरील विद्यमान जकात नाक्यासाठी दहा गुंठे जागा भाडे पट्टयाने घेण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत.

नगर - पुणे रोड वरील विद्यमान जकात नाक्यामुळे रस्त्यावर उभ्या राहणा-या वाहनांमुळे वाहतुकीस मोठया प्रमाणावरती अडथळा होत असल्यामुळे नगर - पुणे रोड वरील मौजे चास स.नं.१०७ मधील दहा गुंठे जागा जकात नाक्याकरिता दरमहा रूपये सात हजार इतक्या भाडयाने घेणे बाबतचा प्रस्ताव केलेला आहे. तरी सदर प्रस्ताव हा मंजूरी करिता मा. स्थायी समितीपुढे घेण्यांत यावा हि विनंती.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नगर पुणे रोड वरील जकात नाक्यासाठी रूपये सात हजार दरमहा प्रमाणे मोकळी भाडयाने घेणेचा प्रस्ताव आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- तीन गुंठयाचा इमारत बांधलेला प्लॉट पांच हजार रूपये दरमहा प्रमाणे भाडयाने भेटतो आहे. या मोकळया जागेचे भाडे जास्त होते आहे.

मा.श्री मुदस्सर अ.इ.- सदर जागेचे दरमहा भाडया बाबत पी.डब्ल्यु डी विभागाचा अभिप्राय मागवावा.

मा.श्री. तिवारी सु.र.- जागा भाडयाने घेण्यांस मंजूरी दयावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज.- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.सभापती साहेब - ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव -** अहमदनगर महानगरपालिकेचे नगर-पुणे रोडवरील विद्यमान जकात नाक्यासाठी चास सर्व्हे नं. १०७ मधील दहा गुंठे जागा दर महा रूपये सात हजार प्रमाणे भाडयाने घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री. तिवारी सु.र

अनुमोदक - मा.श्री. बारस्कर पो.ज

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- ६ सोमवार दिनांक २६/११/२००७

ठराव क्रमांक- ६ सोमवार दिनांक २६/११/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे जुन्या तेवीस वाहनांची जाहिर लिलावाने विक्री करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरांचा तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** विषय - अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांचा लिलाव करणे बाबत.

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या २३ वाहनांच्या लिलाव करणे बाबत दै.नवा मराठा या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती.सीलबंद दरपत्रके दि.८/१०/०७ ते २२/१०/२००७ अखेर मुदत ठेवण्यात येवून २४/१०/२००७ रोजी दरपत्रके मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात उघडणेत आलेली आहेत. दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता केला असता, सरकारी किंमतीपेक्षा पुढील वाहनांचे दर जास्त झाले आहेत

| राकेश गुप्ता | अशोक गुप्ता | रितेश गुप्ता | शकील अहमद खान | भवार कचरू | किंमत न आलेले |
|---|---|---|---|---|---|
| M H -१६ ९७७७ | M H -१६ ९५१९ | M H -१६ ९५८४ | M H -१६ ९८७० | M H -१६ १३७२ | M H -१६ २४२४ |
| M H -१६ ९५२८ | M H -१६ ९५८२ | | M T J ६६९७ | | |
| MWA २९३० | M H -१६ ७७९९ | | M FS ७१९७ | | |
| M H -१६ T-२८ | M H -१६ T-२६ | | | | |
| | M H -१६ T-२७ | | | | |

वाहन क्र. M H - १६ T २९ चे दर सरकारी किंमती पेक्षा कमी आले आहेत तसेच M H – १६ T२४,T२५, T३०, T३१, T ३२, T४०, M H -१२ ५४३६ वाहनांच्या किंमती गुप्ता- शकील अहमद खान यांचे समान आलेले आहेत. श्री .गुप्ता यांनी सर्व टॅक्सेस सहचे दरपत्रक दिलेले आहेत. वाहनांचे समान किंमती आले बाबत चर्चा करून किंमती ठरून वाहन देणे योग्य वाटते. तसेच M H - १६ E २४२४ चे फेर लिलाव करणे संयुक्तीक होईल.सदरचे वाहने लिलावा बाबत यापूर्वी तीन वेळेस कार्यवाही झालेली असून वाहने जुनी होत असून झीज व कींमती कमी होत असल्याने वाहने देणे योग्य सदर प्रस्तावास मा.मुख्यलेखाअधिकारी ,मा.उपायुक्त (कर)

मा.अ.ले.प.तसेच मा.आयुक्त साहेब यांनी स्थायी समिती समोर ठेवणे बाबत मंजूरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) नुसार मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

येणे प्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअर यांचा अहवाल असे.

| वाहन क्र. | सरकारी किंमत | राकेश गुप्ता | अशोक गुप्ता | रितेश गुप्ता | शकीलअहमद खान | भवार कचरू | किंमती न आलेले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| MH-16- 9528 | ३५०००/- | ५५,१०१/- | -- | --- | --- | -- | -- |
| MH- 16-9519 | ४५०००/- | -- | ५५०००/- | | | | |
| MH- 169582 | ६५०००/- | -- | १,०१००/- | --- | --- | --- | --- |
| MH-16 9584 | ६५०००/- | --- | -- | १,०१,१०० | -- | --- | --- |
| MH- 16 9870 | ३५०००/- | --- | --- | -- | ३६,०००/- | --- | --- |
| MTJ- 6697 | २५०००/- | --- | --- | --- | २६,०००/- | --- | --- |
| MWA-2930 | ८००००/- | १,११,१०१ | --- | --- | --- | --- | --- |
| MH-16- 1372 | ७००००/- | --- | --- | --- | --- | ८४,५००/ | --- |
| MFS - 7197 | ३५००/- | --- | --- | --- | ३६०० | --- | --- |
| MH- 16 7799 | १००००/- | --- | ११३००/- | --- | --- | --- | --- |
| MH- 16 9777 | ४००००/- | ५३,०००/- | --- | --- | --- | --- | --- |
| MH- 16 2424 | १,३५,००० | --- | --- | --- | --- | --- | MH- १६ २४२४ |
| MH -16 T24 | १०,०००/- | --- | ११,००० | --- | ११,००० | | |
| MH -16T 25 | १०,०००/- | --- | ११,००० | --- | ११,०००/- | --- | |
| MH -16T 26 | १२,०००/- | --- | १२,९०० | --- | --- | --- | |
| MH -16T 27 | १२,५००/- | --- | १२,६०० | --- | --- | --- | |
| MH -16T 28 | ११,०००/- | ११,१०१--- | १२,६०० | --- | --- | --- | |
| MH -16T 29 | १२,०००/- | सरकारी किंमती पेक्षा कमी किंमती आहे. | --- | --- | --- | --- --- | |
| MH- 16T 30 | १०,०००/- | ११००० | --- | --- | ११,००० | --- | --- |
| MH -16T 31 | १०,०००/- | --- | --- | ११,००० | ११,००० | --- | --- |
| MH -16T 32 | १०,०००/- | --- | --- | ११,००० | ११,००० | --- | --- |
| MH -16T 40 | १०,०००/- | --- | --- | ११,००० | ११,००० | --- | --- |
| MH- 12 5436 | ३७,५००/ | ४०,००० | --- | --- | ४०,००० | --- | --- |

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री जोशी अ.सु.:- सदरचे काही वाहनांसाठी निविदा धारकांचे समान दर आलेले आहेत त्या विषयी काय निर्णय घेणार

मा.सभापती साहेब :- विभाग प्रमुखास सभे मध्यें बोलवावे.

त्या प्रमाणे श्री आर.जी.कुमार मोटार व्हेईकल विभाग हे सभे मध्ये उपस्थित झाले

मा.सभापती साहेब :- समान दरा बध्दल काय निर्णय घ्यावा

मो.व्हे.विभाग श्री कुमार आर.जी.:- सदर निविदा धारकापैकी जो जास्तीचे दर देईल. त्याचे दर मंजूर करून वाहन विक्री करावी.

मा.श्री जोशी अ.सु.:- संबधीत निविदा धारकांना सभे मध्ये बोलवावे.

मा.सहाय्यक आयुक्त श्री देशमुख आर.ए.:- अंतर्गत लेखा परिक्षक यांचे मत घ्यावे.

अं.ले.प.श्री गोरे पी.आर.:- जास्तीचे दर देणारे निविदा धारकास वाहन लिलावाने देण्यांस हरकत नाही जास्तीचे दर मंजूर करून वाहनांची विक्री करावी

मा.श्री तिवारी सु.र.:- बंद पाकीटात समान दर धारकाकडून दर घ्यावेत.

मा.सहाय्यक आयुक्त श्री देशमुख आर.ए.:- बंद पाकीटात दर घ्यावे.

मा.श्री जोशी अ.सु.:- निविदा धारक दर वाढवून देण्यांस तयार आहेत का ? ते किती वाढवून देणार आहेत ते सांगावे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- आलेले जास्तीचे दर मंजूर करावे. पुन्हा लिलावा साठी वाहने ठेवू नका पुन्हा लिलाव करू नका.

मा.श्री बारस्कर पो.ज.:- जादाचे दर मंजूर करावे.

मा.श्री शेख मुदस्सर अ.इ.:- मा.सभापती साहेबांनी अंतिम निर्णय घ्यावा.

मा.श्री तिवारी सु.रं.:- जास्तीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :-ऑफिस रिपोर्टानुसार आलेले जादाचे दरास मंजूरी दयावी. समान दर प्राप्त झालेल्या वाहनांच्या किमंती मध्ये निवीदा धारकांशी केलेल्या चर्चे प्रमाणे निविदा धारक श्री शकील अहमद खान यांनी दिलेल्या एम.एच १६-टी २४,टी२५,टी ३०,टी ३१,टी ३२,टी ४०,एम.एच १२-५४३६या वाहनांच्या किंमती मध्ये रूपये पाचशे अधिक वाढवून आलेल्या जादाचे दरात सदर वाहनांची त्यांना विक्री करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. वाहन क्रमांक एम.एच.१६ टी २९चे सरकारी किंमती पेक्षा कमीचे दर प्राप्त झालेने व एम.एच.१६ ई २४२४ चे दर कुणीही दिलेले नसल्याने सदर वाहनांचा फेर लिलाव करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या तेवीस वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्ट पहाता निवीदा दर धारक श्री राकेश गुप्ता,श्री अशोक गुप्ता,श्री रितेश गुप्ता,श्री शकील अहमदखान,श्री भवार कचरू यांचे स्पर्धात्मकदृटया जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.समान दर प्राप्त झालेल्या वाहनांच्या किमंती विषयी निवीदा धारकांशी केलेल्या चर्चे प्रमाणे निविदा धारक श्री शकील अहमद खान यांनी दिलेल्या एम.एच १६- टी २४,टी २५, टी ३०, टी ३१,टी ३२, टी ४०,व एम.एच १२ -५४३६ या वाहनांच्या किंमती मध्ये रूपये पाचशे अधिक वाढवून आलेल्या जादाचे दरात सदर वाहनांची त्यांना विक्री करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. वाहन क्रमांक एम.एच. १६ टी २९ चे सरकारी किंमती पेक्षा कमीचे दर प्राप्त झालेने व एम.एच. १६ ई २४२४ चे दर कुणीही दिलेले नसल्याने सदर वाहनांचा फेर लिलाव करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर .

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक - मा.श्री बारस्कर पो.ज.

अनुमोदक - मा.श्री तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- ७ सोमवार दिनांक २६/११/२००७

ठराव क्रमांक- ७ सोमवार दिनांक २६/११/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ सालचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ व १०३ नुसार तयार केलेले पुर्नविनियोजीत अंदाज पत्रकास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजूकर** - विषय - सन २००७-२००८ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत.

विनंती टिप्पणी देण्यांत येते कि, सन २००७-२००८ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ व १०३ नुसार तयार करण्यांत आले आहे. पुनर्विवियोजन अंदाजपत्रक मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. तरी सन २००७-२००८ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाचा विषय मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यांत यावा हि विनंती. सोबत मा.आयुक्त यांची मंजूर टिप्पणी व सन २००७-०८ चे पुनर्विनियोजन करावयाचे लेखाशिर्ष, तरतूद व रकमांचा तपशिल जोडला आहे.

येणे प्रमाणे मुख्य लेखा अधिकारी यांचा अहवाल असे.

अहमदनगर महानगरपालिका ,अहमदनगर सन २००७-२००८ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- अंदाज पत्रकाची स्थायी समितीची मिटींग झाली,महासभेने बजेट मंजूर केले नंतर कोणता खर्च कसा झाला ते सांगावे. महासभे मध्ये केडगांव सारसनगर सावेडी इत्यादी उपनगराचे भागातील कामे प्राधान्याने करणेचे ठरले होते. त्या प्रमाणे उपनगराचे भागात किती खर्च झालेला आहे. सारसनगर भागात खर्च झालेला नाही.

मा.सहाय्यक आयुक्त श्री देशमुख आर.ए.:- हेड वाईज खर्च वाचून दाखववावा.

लेखा विभाग श्री परशरामी स.:- जकात विभाग वाहन भाडे मूळ तरतूद रूपये तीन लाख खर्च झालेला नाही. दोन लाखा रूपयांची तरतूद कमी करून एक लाख तरतूद ठेवली आहे.

मा.श्री जोशी अ.सु.:- क्रिअेट केलेल्या बजेट हेड वरील तरतूदीतून झालेला खर्च सांगावा.

लेखा विभाग श्री परशरामी :- विद्युतसाहित्य खरेदी तरतूद ३५ लाख खर्च ३२ लाख शिल्लक ३ लाख नविन स्ट्रीट लाईट ३० लाख खर्च २३ लाख ८१ हजार शिल्लक ६ लाख रूपये.१९ हजार.

मा.श्री जोशी अ.सु.:- नविन तरतूद कशाचे आधारे करतात त्यांचे स्टॅटिस्टीक आहे का ?

लेखा विभाग श्री परशरामी :- संबधीत विभाग सांगू शकेल.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- सन २००६-२००७ साला मध्ये मी यादी देवून इलेक्ट्रीकची कामे सुचविली इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी सर्व्हे करून एस्टिमेट करून मंजूरी साठी प्रस्ताव तयार केला परंतु प्रस्ताव धोरणात्मक असल्याने निर्णय झाला नाही. तो पेडींग पडला. तरतूद केलेली असूनही कामे केलेली नाहीत याचे उत्तर द्यावे.

मा.श्री जोशी अ.सु.- पत्र,यादी देवूनही कामे झालेली नाहीत. काम करून घेण्याचे काही नियम आहेत का ?

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- शहर अभियंता व मा.उपायुकत साहेब यांनी मंजूर केलेली कामे प्राधान्याने करण्यांत यावीत.

मा.श्री जोशी अ.सु.- निधी उपलब्धते नुसार  कामे करण्यांत येईल अशाबाबत प्रशासनाने यादीचे उत्तर देणे आवश्यक होते.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- लाईटचे कामास मंजूरी आहे. निधी दुसरी कडे खर्च होतो. कानडे मळा,नानाजी नगर ,शांती नगर, शक्तीनगर मधील कामे कधी होणार.

मा.सभापती साहेब :- वॉर्ड क्रं. १८ मधील सबजेल चौक ते सार्व .संडास पर्यत मोठी गटर बांधणे बाबत दि.३/४/०७ रोजी मी यादी दिली आहे. ते काम झालेले नाही ते व्हावे.

मा.श्री जोशी अ.सु.:- प्रभाग क्रमांक १२ मध्ये हायमास्ट फिटींग बसविणेचे काम व्हावे.

मा.श्री सय्यद सा.आ.:- कोठला झोपड पट्टी मध्ये स्ट्रीट लाईट करितां पोल उभारणे इले. लाईन ओढणे इ.कामे व्हावीत.

मा.सभापती साहेब :- श्रीकृष्ण नगर ते विद्या कॉलनी पर्यंतचा रस्ता,माधवनगर भागातील अंतर्गत रस्ते,विद्या कॉलनी मधील श्री जाधव घरापासून ते श्री गायकवाड यांच्या घरापर्यतचा इत्यादी रस्ते मजबूतीकरण करून डांबरीकरण करावे. वॉर्ड क्रमांक दहा मधील ब-याच भागात रस्ते नाहीत त्या रस्त्यांचे एस्टिमेट करण्याचे संबधीत अभियंत्यांना आदेश देवून तातडीने कामे पूर्ण करावीत. असलेली तरतूद सांगावी.

लेखा विभाग श्री परशरामी :- रस्ते दुरूस्ती साठी रूपये वीस लाखाची जादा तरतूद केलेली आहे. ती रू.दोन कोटी सत्तर लाख आहे. शिल्लक रू.एक कोटी दहा लाख आहेत. नवीन रस्ते या हेडवर रू.१ कोटी १४ लाख निधी शिल्लक आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.च.:- मा.उपायुक्त श्री हांगे साहेबांनी सारस नगर भागाची पहाणी केली होती.पंरतु तरतूद नसल्याने तेथील कामे केली नाही असे उत्तर मिळाले.

अं.ले.प.श्री गोरे पी.आर.:-अर्थविभागाने आदा केलेल्या बिलांच्या खर्चाची रक्कम अर्थ विभागाकडे असते.

मा.श्री जोशी अ.सु.:- बजेट हेड मंजूरी नुसार बील अकौंट विभागा कडेस रेकॉर्ड होवून जाते तेव्हाच त्याचा खर्चा मध्ये समावेश होतो.

मा.सभापती साहेब :- मा.आमदार साहेबांनी सारस नगर भागातील अत्यावश्यक कामे होण्यासाठी आंदोलन केले होते त्या कामाचे काय झाले.

मा.श्री तिवारी सु.र.:-गटर दुरूस्ती कॉक्रीटीकरण,डांबरीकरण,ड्रेनेज लाईन इत्यादी कामांसाठी जादा तरतूद ठेवावी.

लेखा विभाग श्री परशरामी :- चार कोटी नव्वद लाखाची तरतूद संबधीत विभागाने दिलेल्या आकडेवारी नुसार केलेली आहे.

मा.सौ.भागानगरे म.प्र.:- मा.आमदार साहेबांनी दि.८/१०/२००७ रोजी सारसनगर भागातील नागरी समस्या सोडविणे साठी रास्ता रोका आंदोलन केल होते. त्या वेळी मा.उपायुक्त श्री हांगे साहेब यांनी सारसनगर भागत अत्यावश्यक असणा-या मूलभूत सुविधा पुरविणे साठी मा.आयुक्त साहेब यांच्या अधिकार कक्षा तील रूपये एक कोटी पर्यतची तातडीने करावयाच्या कामाबाबतची अमंल बजावणीची कार्यवाही तातडीने करण्याचे पत्र आमदार साहेबांनी दिलेले होते.परंतु बजेट तरतुद नसल्याने कार्यवाही झालेली नाही. त्या कामा साठी लागणा-या निधीची तरतूद करावी.

अभियंता श्री मगर एन.बी.:- तरतूद करावी लागेल.

मा.श्री जोशी अ.सु.:- एस्टीमेट केलेले आहे का ?

अभियंता श्री मगर एन बी :- रू.एक कोटी पर्यतचे एस्टीमेट केलेले आहे.तरतूद वाढवून घेणे बाबत रिपोर्ट दिलेला आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- नविन रस्त्यासाठी रूपये एक कोटी साठ लाखाची तरतूद आहे त्या मध्ये रू.४० लाखची वाढ करून मा.आमदार साहेबांनी ज्या कामांसाठी आंदोलन केले ती कामे मार्गी लावावीत सारस पुल ते सोलापूर रोड पर्यतचा रस्ता भंडारी घरा पासूनचा रस्ता, कब्रस्थान पर्यतंचा रस्ता या चारही रस्त्याच्या मंजूर कामांचे काय झाले.

मा.श्री जोशी अ.सु.:- माझे प्रभागातील आदर्श नगर मधील राहिलेला रस्ता,रासनेनगर आयोध्यानगर मधील रस्ते या वर्षाचे तरतुदी मधून व्हावेत.

मा.श्री मुदस्सर अ.इ.:- मुंकूदनगर भागातील डब्ल्यु बी.एम.झालेले रस्त्यांवर डांबरीकरण करावे त्यासाठी रूपये वीस लाखाची तरतूद करावी तसेच ज्या भागात कच्चे रस्ते, आहेत. त्या रस्त्यांच्या डब्ल्यु बी.एम. कामासाठी रूपये पांच लाखांची तरतूद करावी.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- चार झोन व महिला बाल कल्याण समिती उपसभापती यांना वाहन देणे बाबतचा ठराव मंजूर केला होता त्याचे काय झाले वर्क ऑर्डर देवूनही कामे झालेली नाहीत.  नविन उद्यान विकास निधी रूपये ४० लाख होता. खर्च झाला नाही. भवानी नगर ओपन स्पेस मध्ये बगीच्याचे काम करावे.

मा.श्री शेख मुदस्सर अ.इ.:- मुंकूंदनगर भागातील तसेच संजोग नगर मधील सिटीझन तसेच कॉम्पलेक्स जवळील बगीच्यांचे काम उद्यान विकास निधीतून करावे.

अं.ले.प.श्री.गोरे पी.आर :- वाहने देणे बाबतचे मंजूर ठरावानुसार मा.आयुक्त साहेब यांचेशी चर्चा करून निर्णय होईल

मा.श्री त्रिपाठी सु.चं.:- पुलांसाठीची तरतूद वाढवावी कानडे मळा चिपाडे मळा येथील पुलांची कामे व्हावीत

मा.सभापती साहेब :- तरतूद करावी वॉर्ड क्र.१० मधील इलेक्ट्रीक विषयीची कामे करून घ्यावीत

मा.श्री मुदस्सर अ.इ.:- मुंकुंद नगर भागात नविन पोल टाकणे व लाईन ओढणेचे रूपये ४० लाख पर्यतचे काम आहे तरतूद करावी.

मा.श्री त्रिपाठी सु.च.:- सारस नगर मधील लाईटींगची कामे करावीत.

मा.श्री तिवारी सु.र.:- पुर्न विनियोजित अंदाज पत्रक मंजूर करावे.

मा.श्री बारस्कर पो.ज.:- नागापूर,बोल्हेगांव येथील लाईटींगची कामे करावीत.अंदाज पत्रकास मंजूरी द्यावी

मा.श्री जोशी अ.सु.:- वॉर्ड क्रमांक बारा मध्ये हायमास्ट फिटींग देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.सदस्यांनी सुचविल्या प्रमाणे कामे प्राधान्याने करण्यांत यावी.त्यासाठी आवश्यक तरतूद करून पुढील कार्यवाही करावी.सभे पुढे सादर झालेल्या सन २००७-२००८ सालचे पुर्नविनियोजीत अंदात पत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव -</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००७-२००८ सालचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ व १०३ नुसार तयार केलेल्या रूपये ४,८९,,५००००/-(रूपये चार कोटी एकोणनव्वद लाख पन्नास हजार फक्त) चे पुर्नविनियोजित अंदाज पत्रकास मंजूरी देण्यांत येत आहे. अखेर मंजूरीस्तव मा.महानगरपलिका सभे पुढे सादर.

सुचक - मा.श्री बारस्कर पो.ज.

अनुमोदक - मा.श्री तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- ८ सोमवार दिनांक २६/११/२००७

ठराव क्रमांक- ८ सोमवार दिनांक २६/११/२००७

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ७१ वेगवेगळया ठिकाणी जाहीरात फलक लावणे करिता दोन वर्षाच्या मुदतीसाठी जागा भाडयाने देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना -अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ७१ वेगवेगळया ठिकाणी जाहीरात फलक लावणे करता दोन वर्षाच्या मुदतीसाठी जागा भाडयाने देणे बाबत.

विषय - अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ७१ वेगवेगळया ठिकाणी दोन वर्षा करिता जाहीरात बोर्ड लावणेसाठी जागा भाडेने देणे बाबतचा निवीदासह प्रस्ताव.

अहमदनगर महानगरपालिकेच्या वेगवेगळया ठिकाणी जाहीरात बोर्ड लावणे करिता सर्व्हे करणेत आला सदर सर्व्हे मध्ये ९० ठिकाणा पैकी ७१ ठिकाणी जाहीरात फलक लावणे करीता मा.नगररचनाकार यांनी जा.नं.१२०४ दि.१७/७/२००७ अन्वये सर्व्हे केलेल्या यादी मधील व नकाशा प्रमाणे वाहतुकीस अडथळा न येता लावण्यास हरकत नाही. असा अभिप्राय दिला. त्यानुसार जाहीरात फलक लावणे करीता दोन वर्षाच्या मुदतीसाठी जाहीर प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता मुदतीत ४ निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| नाव | रक्कम रूपये |
|---|---|
| १. अदित आउट डोअर्स,जळगांव | ४,५०,०००/- |
| २. सॅनव्हीजनस,अहमदनगर | ५,५१,०००/- |
| ३. मेसर्स उपेद्रं पब्लिसिटी,औरंगाबाद | ६,००,९९९/- |
| ४.चंगेडिया आउटडोअर्स ,अहमदनगर | ६,०३,००००/- |

वरील ४ निविदा धारकांपेक्षा चंगेडिया आउटडोअर्स यांनी स्पर्धात्मकदृष्टया प्रत्येक बोर्डला ६७००/- प्रमाणे ९० ठिकाणासाठी ६,०३,०००/-सर्वात जास्त दर दिला आहे. दि.३०/५/०७ च्या छाननी समितीने त्यांचे दरास मंजूरीस शिफारस केली असून नगररचनाकार यांच्या अभिप्रायानुसार ७१ ठिकाणी जाहीरात फलक लावणे करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहीरात व फलक नियंत्रण) नियम २००३ मध्ये महानगरपालिकेच्या जमिनीवरील जाहीरात फलक लावतांना अधिनियमांच्या कलम ७९ च्या आणि या नियमाच्या तरतुदीस अधीन राहून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजूरीबाबत निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक मूल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-जाहिरात फलक लावणे करितां जागा भाडयाने देणे बाबतचा प्रस्ताव आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.व मा.श्री बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री तिवारी सु.र.:- जादाचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- जाहीरात बोर्डा साठी आलेले जास्तीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ७१ वेगवेगळया ठिकाणी जाहीरात फलक लावणे करिता दोन वर्षाच्या मुदतीसाठी जागा भाडयाने देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट पहाता चंगेडिया आउट डोअर्स अहमदनगर यांनी स्पर्धात्मक दृष्टया प्रत्येंक बोर्डला दिलेल्या रूपये ६७००/- (रूपये सहा हजार सातशे फक्त) प्रमाणेचे जास्तीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक - मा.श्री बारस्कर पो.ज.

अनुमोदक - मा.श्री तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.